**Police Commissioner Office Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**सिटीझन पोर्टल प्रेसनोट दिनांक - १२/०९/२०२२**

# महाराष्ट्र पोलीस सिटीझन पोर्टल

❖ **वरील पोर्टलवर नागरिकांना कोणतीही तक्रार ऑनलाईन सबमिट करण्यासाठी सिटीझन पोर्टलची ऑनलाईन तक्रार सुविधा देण्यात आलेली आहे. त्यात नागरिकांनी प्रथम https://citizen.mahapolice.gov.in/Citizen/MH/Index.aspx या वेबसाईट वर जावुन स्वतःचे लॉगिन युझरनेम, पासवर्ड तयार करावे लागते. त्यानंतर ते युझर नेम व पासवर्ड वापरून लॉगिन करुन पुर्ण तक्रार ऑनलाईन सबमिट करता येते. तसेच त्यांच्या तक्रारींची सदयस्थिती त्यांना ऑनलाईन तपासता येते. व त्याबाबत त्यांना SMS द्वारे सुध्दा सुचित केले जाते.**

❖ महाराष्ट्र पोलीस सिटीझन पोर्टल मध्ये सिटीझन पोर्टल हे स्वतंत्र टॅब तयार करण्यात आला असुन त्यामध्ये २४ सुविधा देण्यात येत आहेत.

१) नोंदणी करुन एकुण १५ सुविधा उपलब्ध आहेत.
२) नोंदणी न करता एकुण ०९ सुविधा उपलब्ध आहेत.

❖ **नोंदणी केल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या १५ सेवा खालीलप्रमाणे :-**

१) ई-तक्रार देणे,
२) तक्रारीची सदयस्थिती पाहणे ,
३) नागरिकांची माहिती,
४) नागरिकांची प्रतिक्रिया
५) भाडेकरु/पी.जी. पडताळणी विनंती
६) चारित्र्य प्रमाणपत्र विनंती
७) घटना/कार्यक्रम विनंती
८)निषेध/संप विंनती
९) मिरवणुकीची विंनती
१०) नोकर पडताळणी
११) घरगुती मदत पडताळणी
१२) सी- फॉर्म
१३) वाहनाची चौकशी
१४) गणेशोत्सव परवानगी अर्ज
१५) नवरात्रोत्सव परवानगी

❖ **नोंदणी न करता उपलब्ध होणाऱ्या ०९ सेवा खालीलप्रमाणे :-**

१) हरवलेली व्यक्ती
२) अनोळखी मृतदेह
३) महाराष्ट्रामधील गुन्हे
४) प्रकाशित केलेले प्रथम खबर अहवाल (F.I.R)
५)महाराष्ट्र पोलीस वेबसाईट
६) फरारी व्यक्ती
७) अटक व्यक्ती
८) मोबाईल गहाळ फॉर्म
९) डाउनलोड ( ॲप्लिकेशन फॉर्मस्)

❖ घरभाडेकरू बाबतची माहिती ऑनलाईन भरण्यासाठी सुध्दा लिंक देण्यात आली असुन त्याद्वारे सिटिझन पोर्टलवर नागरिक ऑनलाईन माहिती भरु शकतात.

❖ **ई -तक्रार करावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे :-**

१. आपला आयडी बनवा
२. तुमची तक्रार ऑनलाईन नोंदवा
3. A . तक्रारीच्या गांभिर्याच्या आधारे SHO हे दखलपात्र किंवा अदखलपात्र गुन्हा नोंदणी बाबत निर्णय घेवुन आपणास स्वाक्षरीकृत तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात बोलवतील
   B. तक्रार इतर पोलीस ठाण्याशी संबधित असेल तर ती संबधित पो.स्टे ला पाठवली जाईल. व तसे नागरिकास कळविण्यात येईल.
   **C.** तक्रारीचे स्वरूप इतर विभाग/ कार्यालयाशी निगडीत असल्यास तसे नागरिकास कळविण्यात येईल.
   **D.** वरील प्रकारची तक्रार नसल्यास SHO चौकशी अधिकारी नियुक्त करतील.
४. चौकशी
५. फिर्यादी कडे केलेल्या कारवाईची माहिती कळविण्यात येईल

मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे सो. यांच्या नागरिक स्नेही पोलीस कार्यपध्दतीतुन सिटिझन पोर्टल द्वारे नमुद नागरिकांसाठी सुविधा देण्यात आले आहेत. मा. अप्पर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय) डॉ.काकासाहेब डोळे यांच्या मार्गदर्शनाने सिटिझन पोर्टल या सुविधा देण्यात आले असुन, त्याचा नागरिकांनी अधिकाधिक वापर करावा असे आवाहन करण्यात येत आहे.